कुलसचिव

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक-सेनिसत्कार/१५५९/२०२३ दिनांक : १२/०१/२०२३

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामधील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे आयुष्यभर विद्यापीठात कार्यरत राहून सेवा केलेली असुन सेवा समाप्ती नंतर सेवानिवृत्त होतात. अशा अधिकारी / कर्मचारी यांचा विद्यापीठ प्रशासनातर्फे सत्कार करुन गौरव करणे अपेक्षित आहे. याकरीता जे अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत त्यांची माहिती या कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे.

तसेच विद्यापीठ सेवेमधून सेवानिवृत्त होणारे अधिकारी / कर्मचारी यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी कार्यक्रमाच्या वेळी रजा रोखीकरण बाबतचे धनादेश मा. कुलगुरु महोदयांचे हस्ते प्रदान करण्याकरीता संपुर्ण तयारी संबंधित कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी. तसेच त्यांचे निवृत्ती नंतरचे इतर लाभ त्यांना विनाविलंब विहीत कालमर्यादेत देण्यात यावे, याविषयी कार्यवाही करावी.

करीता या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे आस्थापनेवरील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची नावे दर महिन्याला ५ तारखेपर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावी. जेणेकरुन सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचा दर महिन्याचे शेवटचे दिवशी कृतज्ञता व निरोप समारंभ आयोजीत करून एकत्रितपणे सत्कार करणे सुलभ होईल.

मा. कुलगुरु महोदयांचे मंजुरीने निर्गमित.

कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ---
२) अधिष्ठाता (सर्व) ---
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ---
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ---
५) प्रभारी अधिकारी (सर्व) ---
६) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
७) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ---
८) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी
९) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि.)
१०) सहायक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि./कृ.जै.महा./ अ.तं.महा.) ---
११) सहायक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी (अकोला व नागपूर)
१२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक / तांत्रिक सचिव यांना माहितीकरीता सादर.
१३) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

Officer In Charge, Agricultural Research Information System Cell, Dr. P.D.K.V. Akola
Inward No.
18/01/2023
Dt.: 429